# पुणे महानगरपालिका

## * स्थायी समिती *

## कार्यपत्रिका क्रमांक ७

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १८/५/२०२१** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे दृक श्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### मा.सभासदांचे प्रस्ताव

विषय क्र. १४५

मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेत्या यांचे दि. ५/५/२०२१ चे पत्र.

पी.एम.पी.एम.एल. मधील रोजंदारी सेवक चालक, वाहक, सफाई कामगार, फिटर असे अंदाजे 2300 सेवक काम करीत आहेत. सदर रोजंदारी सेवक हे गेल्या 10 ते 12 वर्षापासून कंत्राटी नसून शासकीय नियमाप्रमाणे पी.एम.पी.एम. एल. मध्ये सरळसेवा भरती झालेले आहेत. दिनांक 3 एप्रिल 2021 पासून सदर सेवकांना बस सेवा बंद असल्यामुळे त्यांना काम मिळत नाही त्यामुळे त्यांचे पगार अद्यापपर्यंत झालेले नाहीत.

सदर रोजंदारी सेवकांनी आपला जीव धोक्यात घालून पुणे मनपा व पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रात कोरोना प्रतिबंधात्मक उपाय योजनेचे व त्या संबंधातील सर्व कामे केलेले आहेत. सध्या पी.एम.पी.एम.एल. कडे इतर काम नसेल व बस संचलन पूर्ण क्षमतेने चालू होईपर्यंत ह्या रोजंदारी सेवकांना पुणे व पिंपरी चिंचवड मनपाकडे कोविड-19 च्या कामासाठी वर्ग करण्यात यावे तशी त्यांची काम करण्याची त्यांची तयारी आहे.

गेल्या वर्षी अशाच प्रकारे कोरोना काळात सुमारे 6 महिने त्यांना पगार मिळाला नाही व त्यांच्यावर उपासमारीचे वेळ आली होती. त्या परिस्थितीतून आजूनही सावरले नसताना परत त्यांच्यावर पगार मिळत नसल्यामुळे उपासमारीची वेळ आली आहे व कर्जबाजारी झाले आहेत.

अशा कोरोना विषाणू आपत्तीच्या काळात त्यांचे मानसिक संतुलन बिघडून त्यांचे सर्व सामाजिक जीवनावर विपरीत परिणाम होवू नये. यासाठी माणूसकीच्या दृष्टीने सकारात्मक निर्णय घेवून सरासरी वेतन किंवा प्रत्येकी रोजंदारी सेवकास उभारी देण्याकरीता उचल र. रु. 15,000/- देण्यात यावे.

विषय क्र. १४६

मा.रविंद्र धंगेकर यांचे दि. ६/५/२०२१ चे पत्र.

मा.स्थायी समिती कार्यपत्रिका क्र.५ विषय क्र.१११ चा फेरविचार करण्यात यावा.

सदर विषयामध्ये प्रभाग क्र. १६ स्विकृत नगरसेवक मधील शाळा, दवाखाना, कमला नेहरू रूग्णालय, आरोग्य कोठी येथे रंगरेगोटी करणे, फर्निचर करणे व भवन विषयक कामे करणे याकामी र.रू. २ कोटी ६३ लाख रूपये इतक्या रकमेची मान्यता स्थायी समितीपुढे प्रशासनाने ठेवलेली आहे.

वास्तविक सध्या पुणे महापालिका आयुक्त यांच्या स्वाक्षरीने काढलेल्या आदेशानुसार नियम अटींस अधिन राहून लॉक डाऊन लागू करण्यात आले आहे. यामध्ये केवळ कोरोना प्रतिबंधात्मक उपाय योजनेचे कामे चालू आहेत. पुणे महापालिकेची आर्थिक स्थिती विचारात घेवून पुणे महापालिका प्रशासनाने वित्तीय समितीची स्थापना केलेली आहे. जेणेकरून खर्च करताना कामाची गरज व इतर बाबी विचारात घेतल्या जातात. कोरोनाची लाट पाहता महापालिकेला कोरोना विषयक खर्च मोठया प्रमाणात येणार आहे. तसेच कोरोनाची तिसरी लाट येणार आहे, असे तज्ञांनी सांगितले असून यावर अनेक उपाय योजना कराव्या लागणार आहेत. पुणे शहरातील लसीकरणाबाबत स्पष्टता नसून याचा देखील खर्च महापालिकेवर येवू शकतो. सदर निविदा पाहता ठेकेदाराने ०.४५ टक्के बिलो रकमेने भरले असून यामध्ये रिंग झाल्याचे देखील स्पष्ट होत आहे. सदर निविदेनुसार होणारी कामे पाहता व यासारखीच तंतोतंत होणारी इतर कामे या कामांचा ट्रेंड पाहता निविदा किमान १८ ते २० टक्के बिलो येणे अपेक्षित होते. प्रशासनाने या सर्व बाबींचा विचार का केला नाही याचा खुलासा प्रशासनाकडून घ्यावा. प्रशासनाने अशा प्रकारच्या निविदेची शिफारस करून स्थायी समितीपुढे हा विषय मान्यतेसाठी पाठवून स्थायी समितीची फसवणूक केलेली आहे.

या सर्व बाबींचा विचार करून मा.स्थायी समिती कार्यपत्रिका क्र.५ विषय क्र.१११ चा फेरविचार करण्यात यावा.

विषय क्र. १४७
मा.सौ.मंजुषा नागपुरे यांचे दि. ७/५/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र.३४ क मधील सार्वजनिक शौचालयाची दैनंदिन स्वच्छता व देखभाल दुरूस्ती करणेसाठी र.रु.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक, बजेट कोड- सीई२२एए५४८/एसजे१०-३०७०, प्रभाग क्र.३४ क मधील अपुर्ण जीमचे काम पूर्ण करणे | १० लाख | -- |
| नविन सुचविलेले काम | | |
| प्रभाग क्र.३४ क मधील सार्वजनिक शौचालयाची दैनंदिन स्वच्छता व देखभाल दुरूस्ती करणे | -- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी

विषय क्र. १४८
मा.महेश वाबळे व मा.आनंद रिठे यांचे दि. १०/५/२०२१ चे पत्र.

आदर्श स्वयंरोजगार सेवा सह.संस्था मर्यादित, मांजरी खुर्द ता.हवेली, जि.पुणे ही संस्था महाराष्ट्र सरकारी अधिनियम १९६० मधील (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२४)कलम ९(१) अन्वये नोंदणीकृत झाली आहे. शासन निर्णय क्रमांक - रोस्वरो-२००२/प्र.क्र.२६७ रोस्वरो-१ अन्वये बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थांना विना निविदा कामे देणेबाबत निर्णय झालेला आहे.

तरी सदर शासन निर्णय नुसार आदर्श स्वयंरोजगार सेवा सह.संस्था मर्यादित या संस्थेस पुणे महानगरपालिकेची कामे र.रू.३ लाखापर्यंत विना निविदा देणेबाबत पुढील योग्य कार्यवाही करावी.

विषय क्र. १४९
मा.दिलिप बराटे व मा.सुनिल गायकवाड यांचे दि. ११/५/२०२१ चे पत्र.

वारजे येथील जनरल हॉस्पिटल व मेटनेटिव्ह हॉस्पिटल येथे ऑक्सिजन युक्त अम्ब्युलन्स खरेदी करणेसाठी र.रु.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक,<br>१) बजेट कोड- सीई२० ए१२६२/एसए१५-१३९६, प्रभाग क्र.३२ अ मधील त्रिमुर्ती सोसायटी येथे कॉंक्रीट करणे | १० लाख | -- |
| २) बजेट कोड- सीई२२ ए६४६/एसजे२२-३८८, प्रभाग क्र.३२ अ मधील वारजे विभागात संरक्षण भिंत करणे | १० लाख | -- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वारजे येथील जनरल हॉस्पिटल व मेटनेटिव्ह हॉस्पिटल येथे ऑक्सिजन युक्त अम्ब्युलन्स खरेदी करणे | -- | २० लाख |

विषय क्र. १५०
मा.श्रीमती अमृता बाबर यांचे दि. ७/५/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र. ४० ब मध्ये एक ॲम्ब्युलन्स (ऑक्सीजन सहीत) खरेदी करणेसाठी र.रु.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक, बजेट कोड- सीई२० सी३५२/एसबी५-६८९, प्रभाग क्र.४० ब मध्ये अंजनीनगर परिसरात विविध ठिकाणी डेकोरेटिव्ह पोल बसविणे | २० लाख | -- |

| | | |
|---|---|---|
| नविन सुचविलेले काम | | |
| प्रभाग क्र. ४० ब मध्ये एक ॲम्ब्युलन्स (ऑक्सीजन सहीत) खरेदी करणे | -- | २० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

विषय क्र. १५१

मा.सौ.मंजुषा नागपुरे यांचे दि. ११/५/२०२१ चे पत्र.

देशात येणाऱ्या तिसऱ्या लाटेत बालकांना मोठ्या प्रमाणात संसर्ग होऊ शकतो असे अनुमान बालरोग तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. बाधित मुलांची संख्या वाढली तर आपल्या आरोग्य यंत्रणेवर ताण येणार आहे. त्या पार्श्वभूमीवर आतापासून आपण या आपत्तीचा सामना करण्यासाठी आपल्या अखत्यारीत असलेल्या सर्व हॉस्पिटलमध्ये कोरोनाबधित लहान मुलांसाठी वेगळे वॉर्ड तयार करावेत. एखादे जम्बो covid सेंटर फक्त ० ते १७ या वयोगटासाठी समर्पित केले तर उत्तम होईल.

त्या मध्ये विशेषतः कोरोना बाधित गरोदर महिलांसाठी सुद्धा प्रसूती गृह तयार करावे. जेणेकरून प्रसूतीनंतर महिला आणि त्यांच्या बाळांना एकत्र ठेवता येईल

## माहितीसाठी आलेले विषय

विषय क्र. १५२

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांच्या अखत्यारीतील माहे १ ते १५ मार्च २०२१ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेल्या कामाची माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.५/६५ दि.१०/५/२०२१ चे पत्र.

विषय क्र. १५३

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांच्या अखत्यारीतील माहे १६ ते ३१ मार्च २०२१ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेल्या कामाची माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.५/६६ दि.१०/५/२०२१ चे पत्र.

विषय क्र. १५४

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि. १/३/२०२१ ते दि.१५/३/२०२१ पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.४/६७ दि.१०/५/२०२१ चे पत्र.

## सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

विषय क्र. १५५

सन २०२१-२२ आर्थिक वर्षाकरीता औंध-बाणेर क्षेत्रिय कार्यालयांतर्गत आऊटसोर्सिंग पद्धतीने हद्दीतील झाडणकाम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मोरया एंटरप्रायझेस यांचे सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.८,८१,४६,५२०=८० पेक्षा २.९९% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ९,०७,८२,१०१=७७ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी शर्तीतील वेळोवेळी होणारी वेतनवाढ व विशेष भत्यातील भाववाढ सुत्रानुसार वाढ अदा करणेस/कपात करणेस, सदर कामे अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने व आऊटसोर्सिंग कचरा वेचक कंत्राटी कामगारांचे निविदा उघडलेल्या दिनांकापासुन (१६/०४/२०२१) वेतन अदा करणेस व बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.२/६८,दि.१०/०५/२०२१ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. १५६**

मा.प्रकाश कदम व मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेत्या यांचे दि. २५/२/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र. ३८ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ६४ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक, बजेट कोड नं. सीई२०अे१२४९/अे६-३८२, प्रभाग क्र. ३८ कात्रज सातारा रोड गुजरवाडी फाटा येथे स.नं. ४५ कात्रज हद्दीपर्यंतचा उर्वरित डी.पी. रस्ता विकसित करणे | ६४लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे | | |
| १) प्रभाग क्र.३८ ड एक्मेकॅलिस्टा व प्रभागामध्ये विविध विकास कामे करणे | --- | २० लाख |
| २) प्रभाग क्र. ३८ ड कात्रज बालाजीनगर येथे विविध विकास कामे करणे | --- | २० लाख |
| ३) प्रभाग क्र. ३८ ड राजीव गांधीनगर, बालाजी नगर परिसरात विविध विकास कामे करणे | --- | २० लाख |
| ४) प्रभाग क्र.३८ ड मध्ये रस्ते विकसित करणे | --- | ४ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १२/४/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५७**

मा.प्रकाश कदम व मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेत्या यांचे दि. २६/२/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र. ३८ ड मधील स.नं. ३० मधील रस्ते विकसित करणेसाठी र.रू. ३२ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक, बजेट कोड नं. सीई२०अे१२४९/एइ६-३७९, प्रभाग क्र. ३८ कात्रज स.नं. ४९, ५४, ५५ मधून जाणारा डी.पी.रस्ता विकसित करणे | ३२ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. ३८ ड मधील स.नं. ३० मधील रस्ते विकसित करणे | --- | ३२ लाख |

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १२/४/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५८**

मा.प्रकाश कदम व मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेत्या यांचे दि. २६/२/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र. ३८ मधील कात्रज सातारा रोड गुजरवाडी फाटा स.नं. ४५ कात्रज हद्दीपर्यंतचा १८ मीटर डी.पी. रस्ता विकसित करणेसाठी र.रू. ३२ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक, बजेट कोड नं. सीई२०अे१२४९/एइ६-३८५, प्रभाग क्र. ३८ कात्रज स.नं. ४२ व ४३ मधून जाणारा डी.पी.रस्ता विकसित करणे | ३२ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. ३८ मधील कात्रज सातारा रोड गुजरवाडी फाटा स.नं. ४५ कात्रज हद्दीपर्यंतचा १८ मीटर डी.पी. रस्ता विकसित करणे | --- | ३२ लाख |

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १२/४/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५९**

मा.सम्राट थोरात व मा.आनंद रिठे यांचे दि. २/३/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र.१८ड,मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.१ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक, पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट गावामध्ये मोठ्या व्यासाच्या ट्रंक लाईन विकसित करणे.(ZE16B102/D२-१५१) | १ कोटी | ---- |
| नविन सुचविलेली कामे - | | |
| प्रभाग क्र.१८ड,मध्ये गुरूवार पेठ विविध ठिकाणी ड्रेनेज विषय़क व तदनुषंगिक कामे करणे | --- | १० लाख |
| प्रभाग क्र.१८ड,मध्ये घोरपडे पेठ विविध ठिकाणी ड्रेनेज विषय़क व तदनुषंगिक कामे करणे | --- | १० लाख |
| प्रभाग क्र.१८ड,मध्ये गंज पेठ विविध ठिकाणी ड्रेनेज विषय़क व तदनुषंगिक कामे करणे | --- | १० लाख |
| प्रभाग क्र.१८ड,मध्ये रविवार पेठ विविध ठिकाणी ड्रेनेज विषय़क व तदनुषंगिक कामे करणे | --- | १० लाख |
| प्रभाग क्र.१८ड,मध्ये महात्मा फुले पेठ विविध ठिकाणी ड्रेनेज विषय़क व तदनुषंगिक कामे करणे | --- | १० लाख |
| प्रभाग क्र.१८ड,मध्ये खडकमाळ आळी येथे विविध ठिकाणी ड्रेनेज विषय़क व तदनुषंगिक कामे करणे | --- | १० लाख |
| प्रभाग क्र.१८ड,मध्ये मोमिनपुरा येथे विविध ठिकाणी ड्रेनेज विषय़क व तदनुषंगिक कामे करणे | --- | १० लाख |
| प्रभाग क्र.१८ड,मध्ये अंगशाह तकिया भवानी पेठ विविध ठिकाणी ड्रेनेज विषय़क व तदनुषंगिक कामे करणे | --- | १० लाख |
| प्रभाग क्र.१८ड,मध्ये शुक्रवार पेठ विविध ठिकाणी ड्रेनेज विषय़क व तदनुषंगिक कामे करणे | --- | १० लाख |
| प्रभाग क्र.१८ड,मध्ये राममंदिर परिसरा येथे विविध ठिकाणी ड्रेनेज विषय़क व तदनुषंगिक कामे करणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १२/४/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. १६०

सन २०१९-२० च्या पुणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात CE22A680 ह्या अर्थशिर्षका अंतर्गत हज हाऊस बांधणे या कामाची र.रुपये ११७.५० लक्ष तरतूद प्रभाग क्र. २७ कोंढवा खुर्द स.नं. ४७/१ येथील पुणे मनपाच्या ताब्यात असलेल्या ॲमिनिटी स्पेसच्या जागेवर हज हाऊसच्या कामासाठीची तरतूद त्याच जागेवर सिव्हीक कल्चरल ॲण्ड कम्युनिटी सेंटर बांधणे या सद्यस्थितीत चालू असलेल्या कामासाठी वापरणेस मान्यता मिळणेबाबत मा.प्र.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/७३२ दि.१९/११/२०१९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १२/४/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. १६१

मा.सौ.ज्योती कळमकर, मा.सौ.स्वप्नाली सायकर व मा.अमोल बालवडकर यांचे दि. ७/१/२०२१ चे पत्र.

माझ्या प्रभागातील गायकवाड पेट्रोलपंपा समोरुन आशियाना पार्क - २, स.नं. २७७ बाणेर येथे जाणारा रस्ता ६ मिटरचा असून तो महापालिकेच्या कलम २१० अंतर्गत ९ मीटर करण्यात यावा.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १२/४/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. १६२

मा.सौ.ज्योती कळमकर, मा.सौ.स्वप्नाली सायकर व मा.अमोल बालवडकर यांचे दि. ७/१/२०२१ चे पत्र.

माझ्या प्रभागातील आनंदबन क्लब औंध पासून ते ग्रीन पार्क सोसायटी बाणेर येथील भाग्यश्री बिल्डींग व स.नं. २७६ बाणेर पर्यंत असणारा रस्ता ६ मिटरचा असून तो कलम २१० अंतर्गत ९ मीटर करण्यात यावा.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १२/४/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. १६३

पुणे महानगरपालिकेस आरोग्य विमा संरक्षण बाबत मार्गदर्शन/सल्ला देणेकरिता सेवा देणारे सल्लागार संस्थेचे पॅनल नेमणेकरिता एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट मा.महापालिका आयुक्त ठराव क्र.६/४९३ दि.२०/११/२०२० च्या मान्यतेनुसार मागविण्यात आले होते. प्राप्त झालेल्या सात संस्थांपैकी चार संस्थांनी (Edelweiss Gallagher, Global, Alliance. India Insure Risk Management ) त्यांच्या संस्थेच्या कामकाजाबाबत संगणकीय सादरीकरण केले आहे. या चारही संस्थांचे कामकाज पाहता त्या सर्वांना empanel करणे शक्य आहे. या कामाकरिता या संस्थांना कोणताही आर्थिक मोबदला पुणे महानगरपालिकेमार्फत दिला जाणार नाही .

तरी पुणे महानगरपालिकेस आरोग्य विमा संरक्षण बाबत मार्गदर्शन/सल्ला देणेकरिता स्वारस्य अभिरूची प्रस्ताव (EOI) मार्फत इच्छुक असलेल्या ३ संस्थांना empanel करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/५७२ दि. ११/१/२०२१ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १२/४/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. १६४

मा.सौ.अल्पना वरपे यांचे दि. २४/३/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र. १० क मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु.५० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक, बजेट कोड सीई२२अे७०४/एसजे२०-११३४, प्रभाग क्र. १० क मधील वात्सल्यपूरम येथील हॉलचे उर्वरित काम करणे. | ५० लाख | --- |
| <u>नविन सुचविलेली कामे</u> | | |
| १) प्रभाग क्र. १० क मधील गादिया इस्टेट येथे मुख्य मलवाहिनी टाकणे | --- | ३० लाख |
| २) प्रभाग क्र. १० क मधील बावधन खुर्द येथे नविन ड्रेनेज लाईन टाकणे | --- | २० लाख |

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १२/४/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

संकीर्ण

विषय क्र. १६५

पुणे पेठ बाणेर स.नं.३३, येथे एकूण २०९ बेडचे ऑक्सिजन हॉस्पिटल उभारण्या कामासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) क नुसार पुणे म.न.पा. कडे सी.एस.आर फंडामध्ये जमा करण्यात आलेल्या रक्कम मधून ऑक्सिजन पाईपलाईन यंत्रणेचे काम रक्कम रूपये ११०.०० लक्ष पर्यंत करून घेण्यास व सदर खर्चाची माहिती मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेकडे सादर करण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शहर अभि./६२ दि.७/०५/२०२१ चे पत्र.

विषय क्र. १६६

टेंडर क्र. ४२/२०२०-२१ नुसार भाडेतत्वावर टुरिस्ट परवाना असलेली वाहने घेणेकामी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/६३ दि.१०/५/२०२१ चे पत्र.

१) भाडेतत्वावर टुरिस्ट परवाना असलेली वाहने मे. जे. के. टुरिस्ट अॅण्ड ट्रान्सपोर्ट, पुणे यांचेकडून त्यांचे टेंडर दराने (७% ने जादा) निविदा रक्कमेच्या वाढीव ५०% म्हणजेच वाढीव रक्कम रुपये ५३,५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये त्रेपन्न लाख पन्नास हजार फक्त) पर्यत नविन निविदा मान्य होईपर्यत घेणेस व त्यापोटी त्यांचेबरोबर करारनामा करणेस ---

२) या निविदामधून दि. ०१/०१/२०२१ पासून घेण्यात येत असलेल्या वाहनांची देयके आदा करणेसाठी केलेल्या कामाची पश्च्यात मान्यता मिळणेस---

म्हणजेच या निविदा मधून यापुर्वी निविदा मान्य रक्कम रु. १,०७,००,०००/- व सदरच्या प्रस्तावानुसार वाढीव रक्कम रु. ५३,५०,०००/- अशी एकूण रक्कम रु. १,६०,५०,०००/- इतकी रक्कम आदा होणार आहे.

विषय क्र. १६७

पुणे मेट्रो रेल प्रकल्पाच्या “स्वारगेट ते कात्रज” (टप्पा क्र. २) या वाढीव भुयारी मेट्रो·मार्गिकेचे कामासाठी सुधारीत आर्थिक सहभागासाठी खालील बाबीस मा. स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्रकल्प)/६४ दि.१०/५/२०२१ चे पत्र.

(१) मा. मुख्य सभा ठराव क्रमांक ३३९ दिनांक १७/०३/२०२१ रदद् करणेस.

(२) स्वारगेट ते कात्रज ( टप्पा क्र.२) या वाढीव भुयारी मेट्रो मार्गिकेचे काम महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि. यांचेमार्फत राबविण्यास.

(३) स्वारगेट ते कात्रज (टप्पा क्र. २) या वाढीव भुयारी मेट्रो मार्गिकेचे काम करणेसाठी मालकीच्या जमिनीची किंमत व पुनर्वसन खर्चासहित र.रू. २४८.६२ कोटी व पुणे महानगरपालिकेच्या आर्थिक सहभागापोटी एकूण प्रकल्प खर्चाच्या १५ % म्हणजेच रक्कम रू.४८५.२३ कोटी असा एकूण र.रू.७३३.८५ कोटी केंद्र शासनाची अंतिम मान्यता मिळालेनंतर खर्च करणेस.

(४) सदर प्रकल्प राबविणेसाठी केंद्र सरकार व राज्य सरकार यांचेकडून उचलण्यात येणाऱ्या कर्ज रक्कमेची कोणत्याही स्वरुपाची हमी पुणे मनपा तर्फे दिली जाणार नाही.

(५) सदर प्रकल्प राबविणेकरिता केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडे पाठपुरावा महा मेट्रोचे स्तरावर करणेस.

(६) स्वारगेट ते कात्रज (टप्पा क्र.२) ही विस्तारित भुयारी मेट्रो मार्गिका व त्यावरील मेट्रो स्टेशन बांधकाम विकास विभागामार्फत डी. पी. नकाशावर दर्शवून घेणेस.

शिवाजी दौंडकर
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)

सुचना – कोरोना विषाणूमुळे उद्भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती. व्हिडीओ कॉन्फरन्सींगची लिंक आपणास व्हॉट्सॲप द्वारे कळविण्यात येईल.